# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय : मा. विशेष स्थायी समिती
दि. २६/१२/२०२५ दु: १२:०० वा.
प्र. ११६

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | १५ |
| | १५/१६ |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/२१९ /२०१५-१६ दिनांक :-०८/१२/२०१५.

## // शुध्दीपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________
सदस्य / सदस्या, स्थायी समिती,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या शुध्दीपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. विशेष स्थायी समिती सभा बुधवार दि. १६/१२/२०१५ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेच्या सुचनेमध्ये नजरचुकीने सभेचे ठिकाण मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह असे नमूद करण्यांत आलेले आहे.

**तरी दि. १६/१२/२०१५ रोजीची मा. विशेष स्थायी समिती सभा मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात आयोजित करण्यांत आलेली आहे याची नोंद घ्यावी.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०५/१२/२०१५.

## मा. विशेष स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- १४ दिनांक ०५/१२/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा बुधवार दि. १६/१२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १४, दि. ०५/१२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सोबत :-**

१) **सभापती निवडणूक कार्यक्रम**
२) **नामनिर्देशन पत्र**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. विशेष स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १४, दि. ०५/१२/२०१५ सोबतची विषय पत्रिका**
**सभा बुधवार दि. १६/१२/२०१५**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ११६ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१५-१६ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत. |

दिनांक :- ०५/१२/२०१५.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बुधवार दिनांक १६/१२/२०१५ रोजी होणाऱ्या मा. स्थायी समिती सभापती पदाकरिता निवडणूक कार्यक्रम.

| वार / दिनांक | तपशिल |
|---|---|
| गुरुवार<br>दि. १० डिसेंबर २०१५<br>(दुपारी ३.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत) | सन २०१५-१६ कालावधीकरीता मा. स्थायी समिती सभापती पदाचे नेमणुकीकरीता नामनिर्देशनपत्र विहित नमुन्यात महापालिका सचिवांकडे कार्यालयीन वेळेत दाखल करणे. |
| बुधवार<br>दि. १६ डिसेंबर २०१५<br>दुपारी १२ वाजले नंतर | प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यावर ...<br>१) बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल.<br>२) मा. स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी व उमेदवारी मागे घेणे.<br>३) कोणत्याही उमेदवारास पुर्ववर्ती पोटनियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नाव वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत त्याने सही केलेली लेखी नोटीस पिठासीन प्राधिकाऱ्यांकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.<br>४) पिठासिन प्राधिकारी आपली उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नांवे संबंधित स्थायी समिती सदस्यांस वाचून दाखवील.<br>५) मा. स्थायी समिती सभापती पदाचे निवडणूकीसाठी आवश्यकता भासल्यास हात वर करुन मतदान घेण्यात येईल.<br>६) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषीत करण्याची कार्यवाही करील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार चढत्याक्रमाने उमेदवाराची यादी तयार करील. ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याची घोषणा करण्यांत येईल.<br>७) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषीत करील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे सोडविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तींकडून चिठ्ठी काढण्यात येईल.<br>८) ज्या उमेदवाराच्या नावाने चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैधरितीने निवडून आला असल्याचे घोषीत करण्यांत येईल. |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सचिव कार्यालय,
मुख्य कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.
दिनांक :- ०५/१२/२०१५

# मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर

## नामनिर्देशन पत्र

नमुना एक

**[ नियम ३ (१) पहा ]**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक**

मी, याद्वारे ______________________ यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी निवडणूकीकरिता सभापती म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

उमेदवाराचे पूर्ण नाव : ______________________

उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता : ______________________

______________________

______________________

उमेदवार हा नगरसेवक म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचा क्रमांक : ______________________

सुचकाचे पूर्ण नाव : ______________________

(सुचकाची सही)

अनुमोदकाचे पूर्ण नाव : ______________________

(अनुमोदकाची सही)

दिनांक :- /१२/२०१५.

## उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी, याद्वारे या नामनिर्देशनाला अनुमती देत आहे आणि माझी निवड झाल्यास, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा सभापती म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शवित आहे.

दिनांक :- /१२/२०१५. (उमेदवाराची सही)

**कृपया मागे पहा**

**विशेष माहिती :-**

१. स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला स्थायी समितीचा कोणताही सदस्य पालिका सचिवांकडे नामनिर्देशन जातीने सादर करील.

२. नामनिर्देशन पत्रात उमेदवाराचे पुर्ण नाव नमुद केलेले असेल आणि त्यावर एका स्थायी समिती सदस्याने सुचक म्हणून व दुसऱ्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असेल.

३. कोणताही स्थायी समिती सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवाराची नामनिर्देशने सुचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही.

४. सभापती नियुक्ती करण्याकरिता सुचक किंवा अनुमोदक असणाऱ्या सदस्यास सभापती पदासाठी निवडणूक लढविता येणार नाही.

५. सुचक-अनुमोदकाने दिलेल्या जागी स्वतःचे संपूर्ण नांव लिहिले पाहिजे व तो स्थायी समितीचा सदस्य असला पाहिजे.

६. कोणत्याही उमेदवाराला एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यास प्रतिबंध केला जाणार नाही. परंतु असे की, कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्यांच्यावतीने चार पेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येणार नाहीत.